लोकमत

# हॅलो औरंगाबाद

औरंगाबाद, सोमवार, दि. १८ डिसेंबर २०१७

### औरंगाबाद महामॅरेथॉनची 'महा'झिंग

गारखेडा परिसरातील विभागीय क्रीडा संकुलामध्ये रविवारी (दि.१७) पहाटे पाच वाजेपासून खेळाडूंनी गर्दी केली होती. मॅरेथॉनमध्ये ठरवलेले अंतर पूर्ण करून आपली शारीरिक क्षमता सिद्ध करणे आणि ठरवलेले ध्येय साध्य करण्याच्या ऊर्मीने पेटलेल्या मॅरेथॉनप्रेमींच्या उत्साहामुळे सगळे वातावरणच विद्युतभारित झाले होते.

पान -४/५



## सारांश

### रिक्षाचालकाची आत्महत्या

औरंगाबाद : रिक्षाचालकाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना रविवारी सकाळी मुकुंदवाडी परिसरातील राजनगर येथे उघडकीस आली. त्याच्या आत्महत्येचे अचूक कारण समजू शकले नाही. याप्रकरणी मुकुंदवाडी ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. अरविंद दिलीप बसवंडे (२५, रा. राजनगर) असे आत्महत्या केलेल्या रिक्षाचालकाचे नाव आहे. पोलिसांनी सांगितले की, काही दिवसांपूर्वी अरविंद आणि त्याच्या सासरच्या मंडळींत भांडण झाले होते. सासरच्या मंडळींनी मारहाण केल्याची तक्रार घेऊन तो ठाण्यात आला होता. त्यावेळी पोलिसांनी त्यास मेडिकल मेमो देऊन घाटीत उपचारासाठी पाठविले होते. यानंतर तो ठाण्यात परत आलाच नाही. दरम्यान, शनिवारी रात्री घरी कोणीही नसताना त्याने छताच्या हुकाला साडी बांधून गळफास घेतला. सकाळी साडेनऊ वाजेच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. याप्रकरणी पंचनामा करून घाटीत त्याचे शवविच्छेदन करण्यात आले. या घटनेचा तपास पोहेकॉ गव्हाणे करीत आहेत.

### मनपाची आज सर्वसाधारण सभा

औरंगाबाद : महापालिकेची सर्वसाधारण सभा सोमवारी सकाळी ११.३० वाजता घेण्यात येणार आहे. या बैठकीत मनपा प्रशासनाकडून स्वच्छ महाराष्ट्र अभियानाचा आढावा, सातारा-देवळाई भागात २ कोटी रुपये खर्च करून रस्ता तयार करण्याचे अंदाजपत्रक, हर्सूल गाळप्रकरणी तीन अधिकारी व कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी, दैनिक वेतनावरील एका कर्मचाऱ्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. भूमिगत गटार योजनेसाठी ९८ कोटी रुपयांचा प्रस्ताव ऐनवेळीत आला होता. सभेला मनपा आयुक्त डी. एम. मुगळीकर येतात किंवा नाही, याकडे पालिकेचे लक्ष आहे.

### सिडको-हडकोत पाण्याचा ठणठणाट

औरंगाबाद : सिडको एन-५ येथील जलकुंभाला लागून एक छोटी जलवाहिनी रविवारी पहाटे फुटली. महापालिकेने युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम हाती घेतले. हे काम करण्यासाठी पाणीपुरवठा विभागाला एन-५ आणि एन-७ येथील पाणीपुरवठा तब्बल ७ तास बंद ठेवावा लागला. रविवारी ज्या वसाहतींना पाणी देण्याचा दिवस होता, त्यांना पाणी मिळाले नाही. सोमवारी या वसाहतींना पाणी देण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

### धोबी समाजाचा २२ डिसेंबर रोजी मोर्चा

औरंगाबाद : आपल्या विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी येत्या २२ डिसेंबर रोजी सकाळी ११ वा. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनावर धोबी समाज मोर्चा काढणार आहे. अ. भा. धोबी समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष बालाजी शिंदे या मोर्चाचे नेतृत्व करणार आहेत. औरंगाबादहून शेकडो समाजबांधव मोर्चात सहभागी होणार आहेत.

---

**हजारोंच्या संख्येने खेळाडूंचा सहभाग : सेलिब्रिटींनी वाढविला उत्साह, आता प्रतीक्षा तिसऱ्या मॅरेथॉनची**

# औरंगाबाद महामॅरेथॉनला 'महाप्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद** : औरंगाबादकरांच्या अभूतपूर्व प्रतिसादाच्या जोरावर रविवारी (दि.१७) 'लोकमत'ने आयोजित केलेल्या दुसऱ्या महामॅरेथॉन स्पर्धेलाही शहरवासीयांसोबत देश-विदेशातील धावपटूंचा 'महाप्रतिसाद' लाभला आणि 'लोकमत समूहा'वर लोकांच्या असलेल्या निस्सीम प्रेमावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले. लोकमतच्या पुढाकाराने होत असलेल्या सॅफ्रॉन लॅण्डमार्क प्रस्तुत औरंगाबाद महामॅरेथॉनमध्ये २१ देशांतील आणि विविध राज्यांतील ३० हून अधिक शहरांतील राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय खेळाडूंसोबतच आबालवृद्धांनी सहभाग घेऊन 'हम भी किसे सें कम नहीं' हे दाखूवन दिले.

'शहर धावले माझ्यासाठी आणि मी धावलो शहरासाठी' या जनभावनेचा 'याचि देही, याचि डोळा' अनुभव या महामॅरेथॉनमध्ये पाहायला मिळाला. वर्षभरापासून प्रतीक्षा लागलेल्या उत्कंठावर्धक दुसऱ्या पर्वामध्ये नागरिकांचा उत्साहदेखील द्विगुणित होता. खेळाडूंनी रविवारी पहाटे-पहाटेच गारखेडा परिसरातील विभागीय क्रीडा संकुलावर जमण्यास सुरुवात केली. मॅरेथॉनमध्ये धावण्याची ऊर्मी एवढी की, पहाटेच्या थंडीचाही त्यांच्यावर काही परिणाम जाणवत नव्हता.

'लोकमत'चे एडिटर-इन-चीफ राजेंद्र दर्डा, 'सखी मंच'च्या संस्थापक अध्यक्षा आशू दर्डा, महापौर नंदकुमार घोडेले, ब्रिगेडियर डी. के. पात्रा, विशेष पोलीस महानिरीक्षक मिलिंद भारंबे, जिल्हाधिकारी नवल किशोर राम, धर्मादाय सहआयुक्त श्रीकांत भोसले, उपायुक्त वर्षा ठाकूर, प्रादेशिक परिवहन अधिकारी सतीश सदामते, धर्मादाय सहआयुक्त श्रीकांत भोसले, नागरी संरक्षण विभागाचे पोलीस अधीक्षक वसंत परदेशी, पोलीस उपायुक्त राहुल श्रीरामे, सहायक आयुक्त सी. डी. शेवगण, सहायक आयुक्त एस. एच. भापकर, पोलीस निरीक्षक शिवाजी कांबळे आणि ज्ञानेश्वर कांबळे, घाटीचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे उपअधीक्षक शिवाकांत बाजपेयी आदी मान्यवरांच्या (पान २ वर )



महामॅरेथॉनमुळे औरंगाबादवासीयांची रविवारची सकाळ उत्साहित झाली. शहरातील रस्त्यारस्त्यांवर विविध वयोगटातील नागरिक धावताना दिसत होते.

### देश-विदेशातील धावपटू झाले सहभागी

- लोकमत महामॅरेथॉनमध्ये देश-विदेशातील धावपटूंनी सहभाग नोंदवत बक्षिसांची लयलूट केली. केनियाची धावपटू ब्रिगीड किमितवार हिने विदेशी गटात प्रथम क्रमांक पटकावला, तर अमेरिकेच्या लॉरेन्सस नेक यांच्यासह इंग्लंड, चीन, केनिया, भूतान, मलेशिया आदी देशांतील खेळाडूंनीही मॅरेथॉनमध्ये आपले कौशल्य दाखवले. यासह देशातील भोपाळ, दिल्ली, हैदराबाद, जयपूर, अहमदाबाद आदी शहरांतील धावपटू मोठ्या संख्येने सहभागी झाले, तर राज्यातील मुंबई, नाशिक, नागपूर, सांगली, सातारा, अकोला, लातूर, परभणी, नांदेड, उदगीर, पुणे, अहमदनगर, कोल्हापूर, वर्धा, यवतमाळ, गडचिरोली आदी शहरांसह ग्रामीण भागातील धावपटू सहभागी झाले होते. महामॅरेथॉनमधील बहुतांश बक्षिसे ही राज्यातील विविध शहरांतून आलेल्या धावपटूंनीच पटकावली आहेत.

### खुल्या गटात किशोर, प्राजक्ता ठरले अव्वल

- पुरुषांच्या २१ कि. मी. खुल्या गटात किशोर जाधव याने वर्चस्व राखले. किशोरने २१ कि. मी.ची अर्धमॅरेथॉन १ तास १७ मिनिटे सहा सेकंदात जिंकली.
- गतवर्षी लोकमत औरंगाबाद मॅरेथॉनमध्ये विजेतेपद पटकावणाऱ्या गजानन ढोले याला या वेळेस मात्र दुसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. गजानन ढोले २१ कि. मी. अंतर १ तास १८ मिनिटे व ३६ सेकंदात पूर्ण केले. विठ्ठल आटोळे हा तिसऱ्या स्थानी आला.
- महिलांच्या खुल्या गटात नागपूरच्या प्राजक्ता गोडबोले हिने प्रारंभापासूनच आघाडी घेताना अव्वलस्थान मिळवले. तिने २१ कि. मी. अंतर १ तास २२ मिनिटे व ५५ सेकंदात पूर्ण केले. पूजा राठोडने दुसरा क्रमांक, तर भारती दुधे हिने तिसरे स्थान मिळवले.

### २१ कि. मी. : किशोर जाधव, प्राजक्ता गोडबोले विजेते

- **पुरुष (खुला गट)** : १. किशोर जाधव, २. गजानन ढोले, ३. विठ्ठल आटोळे.
- **महिला (खुला गट)** : १. प्राजक्ता गोडबोले, २. पूजा राठोड, ३. भारती दुधे.
- **डिफेन्स गट (पुरुष)** : १. भागेश पाटील.
- **ज्येष्ठ गट (पुरुष)** : १. कैलास माने, २. लक्ष्मण शिंदे, ३. राजेश साहू.
- **महिला** : १. शोभा देसाई, २. माधुरी निमजे, ३. शोभा पाटील.
- **विदेशी गट (महिला)** : १. ब्रिगिड किमितवाई.

### १० कि.मी.चे विजेते :

- **खुला गट (पुरुष)** : १. रवी दास, २. एम. हरिया, ३. लालू हिरण्य.
- **खुला गट (महिला)** : १. पूजा श्रीडोळे, २. निकिता नागपुरे, ३. सोनाली पवार.
- **ज्येष्ठ गट (पुरुष)** : १. पांडुरंग पाटील, २. लक्ष्मण लव्हाटे, ३. भगवान कछवे.
- **ज्येष्ठ गट (महिला)** : १. मोनिका माहेश्वरी, २. सुनिती आंबेकर, ३. अनुराधा कछवे.
- **दिव्यांग (पुरुष)** : १. अजित होडेकर, २. नंदी सावंत, ३. संदीप राठोड.
- **दिव्यांग (महिला)** : १. वैष्णवी शिंदे, २. अमृता दीक्षित, ३. जान्हवी वैसनकर.

### सांगलीचा भागेशच ठरला वेगवान धावपटू

- डिफेन्स गटात खेळणारा मूळचा सांगलीचा भागेश पाटीलच खऱ्या अर्थाने वेगवान धावपटू ठरला. त्याने २१ कि.मी. अंतर १ तास ८ मिनिटे आणि ३७ सेकंदांत पूर्ण करताना डिफेन्स गटात अव्वल स्थान पटकावले. २१ कि.मी. ज्येष्ठांच्या पुरुष गटात कैलास माने अव्वल स्थानी राहिला. त्याने १ तास ३२ मिनिटे व ४३ सेकंद वेळ नोंदवला. लक्ष्मण शिंदेने दुसरे स्थान मिळवले, तर राजेश साहूने तिसरा क्रमांक मिळवला. जेष्ठ महिलांच्या गटात शोभा देसाई अव्वल ठरल्या. त्यांनी १ तास ४६ मि. ७ सेकंदात २१ कि.मी. अंतर पूर्ण केले. माधुरी निमजे दुसऱ्या तर शोभा पाटील तिसऱ्या स्थानी राहिल्या.

---

# खैरेंनी दुसऱ्यांच्या नावे शेंगा खाऊ नयेत

**पालकमंत्र्यांचा सवाल : शहराच्या नामकरणावरुन शिवसेनेतच जुंपली**



रामदास कदम



खा. चंद्रकांत खैरे

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : शहराचे 'औरंगाबाद ऐवजी संभाजीनगर' असे नामकरण करण्यावरुन शिवसेनेतच जुंपली आहे. खा.चंद्रकांत खैरेंनी दुसऱ्यांच्या नावे शेंगा खाण्यापेक्षा स्वत: काय करतात ते पाहावे. शिवसेनेचे सर्व मंत्री नालायक आणि ते एकटेच लायक आहेत, असा टोला पालकमंत्री तथा शिवसेना मराठवाडा नेते रामदास कदम यांनी रविवारी पत्रकारांशी बोलताना लगावला.

दोन दिवसांपूर्वी खा.चंद्रकांत खैरे यांनी पालकमंत्री रामदास कदम यांच्यासह शिवसेनेतील सर्व मंत्र्यांवर शहराचे नाव संभाजीनगर करण्याप्रकरणी खापर फोडले होते. खैरेंच्या वक्तव्याचा खरपूस समाचार पालकमंत्री कदम यांनी (पान २ वर )

### पालकमंत्र्यांचा दौरा गुप्त

- पालकमंत्री रामदास कदम यांचा दौरा गुप्त होता. त्यामुळे रात्री उशिरापर्यंत कदम शहरात येऊन गेले हे खैरेंच्या निकटवर्तीयांना माहितीही नव्हते. त्यामुळे पालकमंत्री कदम काय बोलले याची माहिती खैरे गटांकडून घेण्यात येत होती.

### नामांतरासाठी शिवसेनेची निदर्शने

- औरंगाबादचे नाव संभाजीनगर करण्याच्या मागणीसाठी शिवसेनेने रविवारी सकाळी टी. व्ही. सेंटर हडको येथील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर निदर्शने केली. महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केल्यानंतर खा. चंद्रकांत खैरे, जिल्हाप्रमुख नरेंद्र त्रिवेदी, महानगरप्रमुख प्रदीप जैस्वाल, जि. प. अध्यक्षा देवयानी डोणगावकर, नगरसेवक राजू वैद्य, सचिन खैरे, बाळासाहेब थोरात, विजय वाघचौरे यांच्यासह महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी करून परिसर दणाणून सोडला. या निदर्शनाला जिल्हाप्रमुख अंबादास दानवे हे गैरहजर होते.
- 'संभाजीनगर हवे की औरंगाबाद' या शिवसेनाप्रमुखांनी केलेल्या घोषणेला मे २०१८ मध्ये ३० वर्षे पूर्ण होतील. दरम्यान १९९५ ते १९९९ हे साडेचार वर्षे राज्यात, १९९९ ते २००४ हे पाच वर्षे केंद्रात आणि मागील तीन वर्षांपासून केंद्रात व राज्यात शिवसेना सत्तेत आहे. आजवर ३० पैकी साडेबारा वर्षे सेना सत्तेत असतानाही नामकरणाचा मुद्दा राजकीय मुद्दा बनूनच राहिला. दरम्यान सोशल मीडियावर शिवसेनेच्या या भूमिकेवरून जोरदार मॅसेजवॉर सुरु झाले आहे. याचा फटका कुणाला बसतो हे आगामी काळात पाहणे लक्षणीय राहील.

### शिवसेना हिंदुत्ववादी कुठे राहिली

- शिवसेनाप्रमुखांच्या विचाराशी निगडित हिंदुत्ववादी शिवसेना आता राहिली नसल्याचा आरोप भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. भागवत कराड यांनी केला. डॉ. कराड म्हणाले, जर हिंदुवाद कायम असता, तर जि.प. निवडणुकीत भाजपबरोबर सेनेने युती केली असती. फुलंब्रीत पक्षचिन्ह,भगवे उपरणे बाजूला ठेवून काँग्रेसच्या व्यासपीठावर जाऊन शिवसेना नेत्यांनी प्रचार केला. लोकसभा निवडणुका जशा जवळ येतील, त्यानुसार शिवसेना 'संभाजीनगर' नामकरणाचा मुद्दा उकरून काढते. १९९९ ला शिवसेनाप्रमुखांनी फक्त काँग्रेसचा महापौर होऊ नये, म्हणून सेनेचे नगरसेवक जास्त असताना हिंदुत्वासाठी महापौरपदी माझी वर्णी लावली होती. आताची शिवसेना तसा निर्णय घेणे शक्य नसल्याचे अलीकडच्या राजकारणावरून दिसते आहे. कारण शिवसेनेने सत्तेसाठी काँग्रेसशी घरोबा केला आहे. संभाजीनगर नामकरण ही शिवसेनेची नौटंकी राजकारणापुरती आहे. सर्व शिवप्रेमी जनतेला हे समजले आहे.

---





महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठात आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात 'विधि दीपस्तंभ' ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी (डावीकडून)कुलगुरु डॉ. एस. सूर्यप्रकाश, डॉ. एन. आर.माधव मेनन, न्यायमूर्ती आर. एम. बोर्डे, लेखक प्रल्हाद खेर्डेकर आणि डॉ. व्ही. आर.सी कृष्णैय उपस्थित होते.

# विधि अभ्यासक्रमाच्या पुनर्बांधणीची आवश्यकता

**एन. आर. माधव मेनन : विधि विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न**

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : काही** वर्षांपूर्वी कायद्याचे शिक्षण हे पदवी मिळविण्यापुरतेच होते. हे शिक्षण घेणारे विद्यार्थी निराश असायचे. विधि महाविद्यालयांमध्ये नावापुरतेच शिक्षण मिळायचे. मात्र आता दिवस बदलले आहेत. अभ्यासक्रमात नवीन तंत्रज्ञानाचा समावेश झाला आहे. कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम सुरु केले आहेत. यामुळे विधि अभ्यासक्रमांची पुनर्बांधणी करुन गुणवत्तापूर्वक शिक्षण देण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन माजी कुलगुरु पद्मश्री डॉ. एन. आर. माधव मेनन यांनी बीजभाषणात केले.

महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठात 'भोपाळ गॅस दुर्घटना'दिनानिमित्त एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. या चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती आर. एम. बोर्डे, बंगळुरु येथील नॅशनल लॉ स्कूल ऑफ इंडिया युनिव्हर्सिटीचे माजी कुलगुरु पद्मश्री डॉ. एन. आर. माधव मेनन, कुलगुरु डॉ. एस. सूर्यप्रकाश यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना डॉ. मेनन म्हणाले, अभियांत्रिकी, वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या प्रवेश परीक्षेसारखी कायद्याच्या शिक्षणासाठीही 'क्लॅट' ही प्रवेश परीक्षा असावी, असी संकल्पना मांडली होती. ती प्रत्यक्षात अस्तित्वात आली आहे. आता विधि अभ्यासक्रमांची पुनर्बांधणी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या चर्चासत्राचे प्रास्ताविक कुलगुरु डॉ. सूर्यप्रकाश यांनी केले. या कार्यक्रमात विधि विद्यापीठाच्या चळवळीमध्ये अमूल्य योगदान देणाऱ्या डॉ. मेनन यांच्या कार्यावर सेवानिवृत्त प्राचार्य प्रल्हाद खेर्डेकर लिखित 'विधि दीपस्तंभ' या ग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या ग्रंथावर प्रा. राहुल कोसंबी यांनी प्रकाश टाकला. उद्घाटनानंतर झालेल्या पहिल्या सत्रात भोपाळ गॅस दुर्घटनेवर आधारित चित्रफीत दाखविण्यात आली. या सत्राचे अध्यक्षस्थान डॉ. मेनन यांनीच भूषविले. या सत्रात एकूण सहा संशोधकांनी आपले संशोधन पेपरचे सादरीकरण केले. दुसऱ्या सत्राच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. एस. सूर्यप्रकाश होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सत्रातही सहा संशोधकांनी संशोधन पेपरचे सादरीकरण केले.

या राष्ट्रीय चर्चासत्राचा समारोप सेवानिवृत्त न्यायमूर्ती ए. व्ही. नाईक यांच्या उपस्थितीत झाला. क्रांतीलक्ष्मी मुदिराज यांनी सर्वांचे आभार मानले.

---

# मेरिटमधील विद्यार्थ्याने संपविले जीवन

लोकमत न्यूज नेटवर्क



अदित्य पवार

**औरंगाबाद** : येथील देवगिरी महाविद्यालयात बारावीमध्ये शिकत असलेल्या स्कॉलर विद्यार्थ्याने उस्मानपुरा भागातील किरायाच्या खोलीत गळफास घेऊन आत्महत्या केली. त्याच्या आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. ही घटना शनिवारी मध्यरात्री पाऊण वाजेच्या सुमारास उघडकीस आली.

आदित्य भाऊसाहेब पवार (१८) असे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे. उस्मानपुरा पोलिसांनी सांगितले की, आदित्य हा मूळचा अंमळनेर (ता. पाटोदा, जि. बीड) येथील रहिवासी असून तो देवगिरी महाविद्यालयात बारावीमध्ये शिकत होता. येथे शिक्षणासाठी आल्यापासून तो उस्मानपुरा भागातील बिजलीनगरमध्ये किरायाने खोली घेऊन राहत होता. रविवारी रात्री नेहमीप्रमाणे तो त्याच्या खोलीत झोपला. आज सकाळी उशिरापर्यंत तो उठलाच नाही. त्याच्या वडिलांनी त्याच्या मोबाईलवर संपर्क साधला असता त्यांना प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी घरमालकांना फोन करून आदित्य काय करीत आहे, हे खोलीत जाऊन पाहण्यास सांगितले. घरमालकाने खोलीत डोकावून पाहिले असता आदित्यने पंख्याला गळफास घेतल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी या घटनेची माहिती त्याच्या वडिलांना आणि उस्मानपुरा पोलिसांना कळविली. पोहेकॉ. महाजन आणि कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. यानंतर घाटी रुग्णालयात त्याचे शवविच्छेदन करून प्रेत नातेवाईकांच्या स्वाधीन केले. त्याच्या आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. याप्रकरणी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली.

# कारने दुचाकीला नेले फरपटत

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद** : रस्त्याच्या कडेला थांबलेल्या दुचाकीस्वाराला मागून सुसाट आलेल्या कारने सुमारे ४० ते ५० फूट फरपटत नेले. जवाहरनगर पोलीस ठाण्याजवळील वाहतूक चौकात रविवारी दुपारी ४ वाजेच्या सुमारास झालेल्या या अपघातात दुचाकीस्वार जखमी झाला असून, त्याला खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

---

**चौदा शिक्षकांची निवड : साडेतीन महिन्यांनंतर उद्या होणार गुरुजींचा कौतुक सोहळा; नऊ तालुक्यांतील माध्यमिक व प्राथमिक शिक्षक**

# अखेर शिक्षक पुरस्कारासाठी जिल्हा परिषदेला सापडला मुहूर्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद** : ग्रामपंचायत निवडणूक आचार संहितेमुळे तब्बल साडेतीन महिन्यांनंतर जिल्हा शिक्षक पुरस्कारासाठी जिल्हा परिषदेला मुहूर्त सापडला आहे. १९ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास जिल्ह्यातील १४ शिक्षकांना या पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे.

जिल्हा परिषदेच्या शाळांतील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांना दरवर्षी पाच सप्टेंबर रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून जिल्हा शिक्षक पुरस्काराने सन्मानित केले जाते. याही वर्षी शिक्षक दिनापूर्वीच या पुरस्कारासाठी शिक्षकांकडून प्रस्ताव मागवले होते. तालुकानिहाय दोन या प्रमाणे नऊ तालुक्यांतील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांकडून, तर विशेष शिक्षकाच्या एका पुरस्कारासाठी प्रस्ताव मागवण्यात आले; परंतु प्राथमिक व माध्यमिक शिक्षक पुरस्कारासाठी सोयगाव तालुक्यातून एकही प्रस्ताव प्राप्त झाला नाही. विशेष शिक्षक पुरस्कारासाठीही जिल्ह्यातील एकही प्रस्ताव नाही. नऊ माध्यमिक शिक्षक पुरस्कारांपैकी अवघे ६ प्रस्ताव आले असून, यासाठी सिल्लोड व सोयगाव तालुक्यांतून एकही प्रस्ताव आलेला नाही.

जि.प. अध्यक्षा देवयानी पाटील डोणगावकर यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने प्रस्तावांची छाननी करून यादी अंतिम केली. सदरील यादीला विभागीय आयुक्तांचीही मंजुरी मिळाली; पण ग्रामपंचायत निवडणुकीची आचार संहिता उठली, तरी पुरस्कार वितरण सोहळ्याला मुहूर्त सापडत नव्हता. अखेर शिक्षण सभापती मीनाताई शेळके व डोणगावकर यांनी १९ डिसेंबर रोजी पुरस्कार वितरणाचा समारंभ ठेवण्यास अनुमती दर्शवली. त्यानुसार शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

### हे आहेत जिल्हा पुरस्कारप्राप्त शिक्षक

- प्राथमिक शिक्षक पुरस्कारासाठी निवड झालेले औरंगाबाद तालुक्यातील अंकुश इत्थर, पैठण तालुक्यातील चंद्रकांत घोडके, गंगापूर तालुक्यातील बालचंद गोरे, वैजापूर तालुक्यातील प्रभाकर बारसे, कन्नड तालुक्यातील सारिका जांभळे, खुलताबाद तालुक्यातील परमेश्वर गोटे, सिल्लोड तालुक्यातील विजया चापे आणि फुलंब्री तालुक्यातील बाबूराव गाडेकर हे शिक्षक आहेत.

माध्यमिक शिक्षक पुरस्कारासाठी पैठण तालुक्यातील रेणुका माळेवाडीकर, गंगापूर तालुक्यातील लक्ष्मण जावळे, वैजापूर तालुक्यातील अरुण शिंदे, कन्नड तालुक्यातील उदयराम घावरी, खुलताबाद तालुक्यातील वसंतराव राठोड आणि फुलंब्री तालुक्यातील प्रतिभा पाईकराव या सहा शिक्षकांची निवड करण्यात आली आहे.

---

# हत्ती गेले, आता 'झू'मध्ये हवाय 'सिंह'

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : सिद्धार्थ** उद्यानाच्या प्राणिसंग्रहालयातील हत्ती सरस्वती आणि तिची मुलगी लक्ष्मी यांची विशाखापट्टणम येथे रवानगी केल्यानंतर आता प्रशासनाला सिंहाची जोडी आणण्याचे वेध लागले आहेत. या संदर्भात मनपाने केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाकडे मागणीही केली आहे. यापूर्वी मनपाने टांझानिया येथून जिराफची जोडी आणण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू केले होते. मात्र, प्रशासनाला यश आले नाही. वर्धापन दिनानिमित्त ७ ते ९ डिसेंबरदरम्यान, सिद्धार्थ उद्यान आणि प्राणिसंग्रहालयात मोफत प्रवेश ठेवण्यात आला होता. तीन दिवसांमध्ये किमान दीड लाखांहून अधिक नागरिक, बच्चे कंपनीने उद्यानात हजेरी लावली होती. सिद्धार्थ उद्यानाची बच्चे कंपनीत प्रचंड क्रेझ आहे. महापालिकेने मागील काही वर्षांमध्ये (पान २ वर )